## * प्रकरण - चौथे *

# भारतीय लेखक आणि पाश्चिमात्य संस्कृती

* प्रकरण – चौथे *

# भारतीय लेखक आणि पाश्चिमात्य संस्कृती

भारतीय लेखकांच्या मनात संस्कृतीच्या काही कल्पना अगदी दृढ बसल्या आहेत. संस्कृती, संस्कृती म्हणजे नेमक्या शब्दांत असे म्हणता येईल की, "जे करायचे नाही हे ज्यामध्ये सांगितले आहे ती बंधने स्वेच्छेने स्वीकारणे आणि अंमलात आणणे म्हणजे संस्कृती."

## भारतीय समाजव्यवस्था –

जे करायचे नाही म्हणजे जे अनैतिक आहे. जे अश्लील आहे. जे लांच्छनास्पद आहे. जे समाजाला पर्यायाने राष्ट्राला घातक आहे. इत्यादी सर्व काही टाळणे. भारतीय माणसाच्या मनात प्रत्येक गोष्टीची एक ठराविक चौकट असते. प्रत्येक गोष्ट करताना त्या चौकटीला अनुसरूनच झाली पाहिजे असा अट्टाहास असतो. ती त्यानुसार होण्यासाठी कितीही कष्ट पडले तरी चालतील पण तसेच झाले पाहिजे अशी एक मानसिकता असते.

लेखक हा समाजाचा एक घटक असल्यामुळे सामाजिक जीवनाचा त्याच्यावरही परिणाम होतच असतो. त्यामुळेच सामाजिक मानसिकता जशी असेल तशीच लेखकाची होते. भारतीय माणूस आयुष्यातील प्रत्येक गोष्ट रीतीने रूढीनेच झाली पाहिजे असा हट्ट धरतो. अगदी मूल जन्माला आल्यापासून त्याचे नामकरण मुंज या गोष्टींपासून आयुष्यातल्या चांगल्या वाईट सर्व गोष्टी रूढीनुसार धर्म, परंपरेप्रमाणेच करतो.

माणसाच्या आयुष्यात सर्वात जास्त महत्त्व असते ते त्याच्या नात्यांना, त्याच्या नातेसंबंधांना. भारतीय समाजात प्रत्येक नात्याला एक ठराविक साचा आहे त्यानुसारच ती नाती असणे गरजेचे आहे. म्हणजे वहीनीने आपल्या दिराशी वागताना जास्त अघळपघळपणे वागून चालत नाही. दीर किंवा नणंद जरी वयाने लहान असले तरी त्यांना आदरार्थी संबोधावे लागते. त्यांच्याशी बोलताना अदबीने बोलावे लागते. जर असे वागले नाही तर त्या स्त्रीला घरातल्या इतरांचा रोष पत्करावा लागतो. प्रसंगी मोठया माणसांकडून समज दिली जाते.

सासू, सून या नात्यामध्ये तर खूपच तणाव असतो. सासू घरातील प्रमुख असल्यामुळे तिला प्रत्येक गोष्ट करताना पसंती नापसंती विचारावी लागते. प्रसंगी तिचे पटत नसले तरी हो म्हणावे लागते तिला काहीही बोलता येत नाही. तिला जर काही बोलावे तर घरात तणाव निर्माण होतो शिवाय समाजात भांडकुदळ असा शिक्का बसतो. कुटुंबात सर्वच स्त्री-पुरुषांना अदबीने वागावे लागते.

पती-पत्नी असले तरी त्यांनी वडिलधाऱ्यासमोर मोठयांच्या किंवा लहानांच्या नजरेला येतील अशा कृती करणे ही गोष्ट अश्लील मानली जाते. पती-पत्नी एकमेकांना इतरांसमोर स्पर्श ही करु शकत नाहीत. म्हणजेच थोडक्यात ज्या गोष्टी एकांतात करायच्या असतात त्या तिथेच कराव्या. इतरांच्या समोर उगीच चाळे करणे हे असभ्यपणाचे मानले जाते.

समाजमन कसे असते हे सांगण्यासाठी पुढील दाखला दिला जातो. रस्त्याने जर बहीण-भाऊ चालले असले तर त्यांच्याकडे बघणारे इतर लोक त्यांना बघताना एक तरुण व एक तरुणीच बरोबर चालली आहेत असे म्हणतील म्हणजेच थोडक्यात त्यांच्याकडे बघण्याची दृष्टी ही अशीच आहे. पण त्यातील कोणीच ती बहीण-भाऊ असतील असे म्हणणार नाही. समाजात वावरताना स्त्री-पुरुष यांच्याकडे बघताना नेहमी एक नर व दुसरी मादी यादृष्टीनेच पाहिले जाते. म्हणजेच समाजात त्यांच्यात नर-मादी हाच संबंध असतो. यामुळेच समाजात वावरताना प्रत्येकाला ठरवलेल्या किंवा असलेल्या संकेतानुसारच वावरावे लागते.

भारतीय समाजात जी काही बंधने आहेत ती जास्त करून स्त्रियांकडेच जास्त आहेत. समाजात वावरताना स्त्रीलाच बहुतेक बंधने पाळावी लागतात. स्त्रीने फक्त मुले व घर सांभाळावे. बाहेरच्या गोष्टीत नाक खूपसू नये असे सर्वाचे अगदी पूर्वापारपासूनचे मत आहे. अगदी पूर्वी तर स्त्री जर घर सोडून बाहेर आली तर अनर्थ होईल अशा गोष्टी बोलल्या जायच्या. आता शिक्षणाच्या प्रसारामुळे स्त्री बाहेर पडली आहे.

स्त्रियांना प्रत्येक गोष्टीत बंधन म्हणजे तिने जास्त वेळ बाहेर जाऊ नये, एकटी फिरू नये, इतरांशी जास्त बोलू नये, प्रत्येक गोष्ट पुरुषांच्या मदतीनेच करावी, असे काही अलिखित संकेत आहेत ते पाळावेच लागतात ते जर पाळले नाहीत तर समाजाच्या दृष्टीने ती स्त्री सद्वर्तनी मानली जात नाही. स्त्री ही पुरुषाच्या आधाराशिवाय काही करू शकत नाही अशी एक

मानसिकताच आहे. पुरुषांनाही काही बंधने आहेत जसे पुरुषांना अर्थार्जन करून कुटुंबाचे पालन पोषन करावे लागते. आर्थिक बाबतीत संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी पुरुषांनी उचलायची असते. त्याचप्रमाणे परस्त्रीशी संबंध ठेवू नये अशा सामाजिक संकेतानुसार वागावे लागते.

भारतीय समाजात स्त्री-पुरुष संबंध हा मुद्दा अगदी महत्त्वाचा मानला जातो. प्रत्येक माणसाच्या आयुष्यातला अगदी महत्त्वाचा मुद्दा कोणता असेल तर स्त्री-पुरुष संबंध. ते कसे आहे यावरच त्या व्यक्तीचा दर्जा ठरवला जातो. इथे स्त्री-पुरुष संबंधाबाबत काही ठराविक नियम आहेत त्या नियमांच्या चौकटीत राहूनच वर्तन करावे लागते. भारतीय समाजात स्त्री-पुरुष संबंधावरूनच समाजातील प्रतिष्टा किंवा पत ठरवली जाते. समाजात एका ठराविक वयात आपल्याच जातीतील एखादया मुलीबरोबर विधीवत, धर्मानुसार लग्न लावून देतात. त्या मुलीबरोबरच शारीरिक संबंध ठेवता येतात. इतर कुणाबरोबरही शारीरिक संबंध ठेवता येत नाहीत. भारतीय धर्माप्रमाणे म्हटले तर एक पत्नी सोडली तर इतर सर्व स्त्रिया या माता व भगिनींप्रमाणे असतात. त्यांच्याशी किंवा पुरुषांशी वागताना त्या मर्यादेनेच वागावे लागते.

समाजात या ठराविक मर्यादेत जे वागत नाहीत. त्याला समाजात मान नसतो. त्याची इतरांच्या दृष्टीने पत कमी असते. एक पत्नी किंवा स्वत:चा पती सोडला तर इतरांशी संबंध आला तर तो समाजाच्या दृष्टीने व्यभिचार ठरतो. व्यभिचार ठरवताना शारीरिक संबंध आहे किंवा नाही याची शहानिशासुद्धा केली जात नाही. सतत संपर्क असेल तरीही समाज व्यभिचारी ठरवतो. भारतीय समाजात व्यभिचार म्हणजे एक अक्षम्य अपराध मानला जातो. अजूनही काही ठिकाणी व्याभिचारीलाही ठेचून मारणे ही शिक्षा दिली जाते. खेडेगावात वयस्क लोकांना न्यायनिवाडा करण्याचा हक्क असतो. अशावेळी एखादी विधवा किंवा कुमारिका गरोदर राहिली असेल तर तिला गावातील इतर लोकांनी जीव जाईपर्यंत दगडाने ठेचून मारावी अशी अमानवी पाशवी शिक्षा दिली जाते.

काही ठिकाणी व्याभिचार ज्या कुटुंबात झाला असेल अशा कुटुंबाशी संपर्क तोडला जातो. त्या लोकांना वाळीत टाकले जाते. त्यांचा मानसिक छळ केला जातो. काही वेळेस छळाला कंटाळून आत्महत्या केली जाते. इतराशी झालेला शारीरिक संबंध हा समाजाच्या दृष्टीने

अपराधच असतो. अशावेळी स्थळ, काळ, परिस्थिती इ. कोणत्याच गोष्टीचा विचार न करता शिक्षा दिली जाते.

भारतीय समाजात शारीरिक संबंध ठेवणे ही खाजगी म्हणजे वैयक्तिक बाब मानले जात नाही. ती एक सामाजिक गोष्ट म्हणून पाहिले जाते. त्यामुळेच याबाबतीत कडक बंधने आहेत. इतकेच काय तर वयात आलेले म्हणजेच यौवनावस्थेतील मुले मुली एकत्र हिंडू फिरू शकत नाहीत. त्यांना एकटयाने फिरण्याची मुभा नाही. त्यांच्यावर त्यांच्या पालकांचे सूक्ष्म लक्ष असते. विशेषकरून मुलींना घराबाहेर पडू दिले जात नाही. इथूनच मुलींच्या मनात एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो. त्यामुळे तिला पुढे आयुष्यभर कोणत्या ना कोणत्या रूपात पुरुषाच्या आधाराची गरज लागते.

भारतीय समाजात शारीरिक संबंध ही गोष्ट दुर्लक्षित आहे. त्यामुळे येथे मुलांना कोणत्याही प्रकारचे लैंगिक शिक्षण दिले जात नाही. या गोष्टीवर कधीही उघड चर्चा केली जात नाही. त्यामुळे यौवनावस्थेतील मुलांच्यात बरेच गैरसमज आहेत. या गैरसमजांचे कुठेही निकारण होत नाही. घरात आई, वडील, बहीण, भाऊ, यांच्यासमोर या गोष्टीवर चर्चा म्हणजे अशक्य त्यामुळे याबाबतीत एक गोंधळाचे वातावरण आहे. इथल्या पालकांनाही मुलांना माहिती दयावी त्यांना माहिती असणे गरजेचे आहे असे वाटत नाही. पालकांच्या मते लग्न झाल्यावर या गोष्टी आपोआपच कळतात. त्यामुळे माहिती देण्याची गरज नाही. या सर्व गोष्टीमुळे मुलांच्यावर वेगळाच परिणाम झाल्याचे दिसते. त्यांना या शारीरिक गोष्टीबद्दल विनाकारण उत्सुकता निर्माण होते. आणि या उत्सुकतेपोटी किंवा अज्ञानापोटी काही तरी वेगळेच घडताना दिसते. कुलीन मुलांनी या गोष्टी बोलू नये, विचारू नये, करू तर नयेच अशी एक सर्वाची विचारसरणी आहे.

भारतीय समाजात स्त्रीला अर्थाजनासाठी बाहेर पडू दिल जात नव्हतं. स्त्रियांना घराबाहेर पडण्यासाठी एकविसावे शतक उजाडले त्या भांडून घराबाहेर पडल्या खऱ्या पण तिथेही प्रतिष्ठा, पत या गोष्टी आडव्या आल्याच. प्रत्येक गोष्टीत कुटुंब आमची प्रतिष्ठा जाईल असे करू नको, असे वागू नको अशा सूचनांचा भडिमार करते. स्त्रीला आपल्या म्हणण्यानुसार वागता येत नाही. कारण त्या स्त्रीच्या चारित्र्यानुसार या कुटुंबाची समाजातील पत ठरवली जाते. त्यामुळेच इथला पती आपल्या पत्नीला नोकरीला परवानगी देताना प्रथम दहा वेळा विचार करतो. नंतरच होय

किंवा नाही हा निर्णय देतो. इथे स्त्रीला स्वत:चे करियर करण्याची मुभा नाही. तिथे मुले व घर सांभाळावे असे गृहीतच धरले आहे. असे करणारी ही समाजाच्या दृष्टीने आदर्श स्त्री असते. जर स्त्री नोकरी करत असेल तर तिला बऱ्याच गोष्टींना सामोरे जावे लागते. जसे कुटुंबात मुले व इतर माणसे यांची काळजी तिला एकटीलाच घ्यावी लागते. नोकरी करते म्हणून यातून सुटका नसते. शिवाय ऑफिसमध्ये स्त्री म्हणून कमीपणाची वागणूक इतर सहकाऱ्यांकडून मिळते ही गोष्ट आहेच. म्हणजेच नोकरी करणाऱ्या स्त्रीला कुटुंब व ऑफिस या दोन्ही गोष्टी व्यवस्थित सांभाळण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. अशी कसरत करतच तिला आपले आयुष्य घालवावे लागते.

प्रत्येक माणूस हा समाजाचा एक घटक असल्यामुळे समाजातील या नियमांचा व या संकेतांचा माणसावर परिणाम होतच असतो. माणूस ज्या वातावरणात लहानाचा मोठा होतो त्या वातावरणाचा त्याच्या व्यक्तिमत्व विकासात मोठा हातभार असतो. त्या वातावरणातील सर्वच गोष्टी त्याच्यात उतरतात. तो त्याच गोष्टींचे अनुकरण करीत असतो.

लेखकही याच समाजाचा एक घटक असतो. त्यामुळे त्याच्या लहानपणापासून तो ज्या गोष्टी पहात आला आहे त्याच गोष्टींचा त्याच्या मनावर पगडा असतो. प्रत्येक गोष्टीचा त्याच्याकडे ठराविक साचा असतो. समाजात स्त्रियांनी व पुरुषांनी कसे वागावे त्यांचे परस्परांशी संबंध कसे असावे याविषयीच्या त्याच्या कल्पना दृढ असतात. त्यानुसारच ते संबंध हवेत अशी त्याची अपेक्षा असते. त्यामुळेच अशावेळी लेखकही त्या गोष्टीकडे बघताना त्याच दृष्टिकोणातून बघतात. कुटुंबातील जी नाती आहेत. त्या प्रत्येक नात्यातील माणसाने कसे वागावे याविषयीचे एक मत तयार झाले आहे. त्याशिवाय वेगळे दिसले तर ते त्यांना पचत नाही. म्हणजेच मान्य होत नाही. प्रत्येकाने ठरवलेल्या चाकोरीतून जगले पाहिजे असेच त्यांचे मत असते. कारण एकूण समाजमनाचा विचार केला तर सूर असाच दिसतो. म्हणजेच भारतीय लेखकांचा विचार केला तर त्यांच्या समाजातील नातेसंबंध याविषयी काही दृढ संकल्पना आहेत. त्यानुसारच असायला हवे अशी अपेक्षा आहे.

भारतीय लेखकांचा विचार केला तर व्यभिचारासंबंधीही समाजाप्रमाणेच हे लोक विचार करतात. व्यभिचार हा समाजाच्या दृष्टीने घातक आहे. लांच्छनास्पद बाब आहे असेच

मानतात. भारतीय भाषांतील साहित्य वाचले तर एकूण दृष्टिकोण तसाच दिसून येतो. साहित्यातही शारीरिक संबंधाबद्दल जास्त सविस्तर लेखन आढळत नाही. काही लेखक मात्र प्रेम व प्रेमिका यांची वर्णने त्यातील प्रेमप्रसंग यांचे वर्णन चवदार रितीने करताना दिसतात. पण त्यातही शारीरिक संबंधाची माहिती नसते. तिथे फक्त रोमँटिक प्रसंगाचे वर्णन येते. साहित्य वाचताना त्यातील प्रमुख पात्रे ही समाजिक नियमांनुसार वागतात दिसतात. समाजनियमांविरुद्ध वागणारे हे साहित्यातसुद्धा गुन्हेगारच दाखवले आहेत. म्हणजेच मनाप्रमाणे वागणारे ते स्वैराचारी व वृच्छंकलच असतात असे दाखवले जाते. समाज व कुटुंबासाठी असे लोक भारच असतात असे ठरवले जाते. त्यामुळेच वाचकांच्या मनावर त्याचप्रमाणे परिणाम होतो.

व्यभिचार हा लेखकांच्या मानसिकतेतून अक्षम्य असा गुन्हा आहे. चारित्र्य हा संपूर्ण कौटुंबिक लेखनाचा पायाच ठरविला आहे. चारित्र्य हे शारीरिक संबंधावरच अवलंबून असते असेच मानले जाते. त्यामुळेच ज्याचे चारित्र्य चांगले तोच नायक आणि चारित्र्य डांगाळले म्हणजे तो बरबादच झाला. त्याचा अध:पात झालाच. त्याचे जीवन संपले असेच साहित्यात लिहलेले दिसते. त्यामुळे वाचकावर पर्यायाने समाजमनावर त्याचा परिणाम होतो. साहित्यातही स्थळ, काळ, वेळ, परिस्थिती यानुसार व्यभिचार झाला असेल असे ठरवून दुर्लक्ष केले जात नाही. साहित्यातही शारीरिक संबंध म्हणजे अगदी जीवन-मरणाचा प्रश्न म्हणूनच रंगविला जातो. शारीरिक संबंध एक नैसर्गिक गोष्ट म्हणून मानले जात नाही. तर ती मानवाची एक चैन आहे असेच वर्णन केले जाते. साहित्यात शारीरिक संबंध म्हणजे अगदी परमोच्च्य बिंदू आहे असे मानूनच वर्णन केले जाते. त्यामुळेच बरेच साहित्य याभोवती फिरताना दिसते.

साहित्यातही समाजाप्रमाणेच संकल्पना आहेत. व्यभिचार हा स्त्रियांच्याबाबतीतच जास्तकरून वर्णन केला जातो. समाजाप्रमाणेच इतर पुरुषांबरोबर संबंध असणारी स्त्री ही व्यभिचारी असते. भारतीय समाजातील रूढीप्रमाणेच, परंपरेप्रमाणेच वागणारी स्त्री ही आदर्श ठरली जाते.

भारतीय समाजात त्यागी वृत्ती दिसून येते. कमीत कमी त्यागी माणसे आदर्श ठरतात. कारण प्रत्यक्ष त्याग करायचा की नाही हे ज्याच्या त्याच्यावर अवलंबून असते. पण समाजाच्या संस्कृतीनुसार जी व्यक्ती आपल्या स्वत:च्या सुखाचा इतरांसाठी त्याग करते ती व्यक्ती आदर्श

असते. त्या व्यक्तीचे सगळीकडे कौतुक होते. तीची समाजात प्रतिष्ठा वाढते. म्हणूनच सामान्य लोकांनी भोगीवृत्तीपेक्षा त्यागी वृत्ती अंगी टेवावी असे मनावर बिंबवले जाते.

भारतीय परंपरेनुसार जो भोग घेतो तो राक्षस असतो. जो आपले सुख इतरांसाठी त्यागतो तो देव असतो. त्यामुळेच ही संस्कृती त्यागी संस्कृती आहे. याचे उत्तम उदाहरण असे देता येईल, जो भूक न लागता खातो ती म्हणजे विकृती. जो भूक लागली असतानाही आपले अन्न उपाशी माणसाला देतो ती संस्कृती.

थोडक्यात जो त्याग करतो तो सुसंस्कृत मानले जाते. आपल्याबरोबर इतरांच्या त्यापेक्षा इतरांचाच जास्त विचार करतो तोच उत्तम मानला जातो. जी बाई प्रसंगी स्वत: उपाशी राहते पण मुलांचे पोट अगोदर भरते. जो कर्ता पुरूष स्वत:च्या गरजा बाजूला टेवून कुटुंबाच्या गरजा भागवतो तो पुरूष ती बाई उत्तम गृहस्थ व गृहिणी असते. थोडक्यात काय त्याग हा सर्वश्रेष्ठ मानला आहे.

साहित्यात तर काय पूर्वीपासून उच्चतम पराकोटीतील त्याग केलेल्यांचाच जयजयकार केलेला दिसतो. समाजाच्या दृष्टीने ते आदर्श टरतात. उदा. राम-सीता या दोघांनी जीवनात आपल्या सगळ्या सुखांचा त्याग इतरांसाठी केलेला दिसतो. म्हणूनच ते अजूनही भारतीय समाजात आदर्श आहेत. वागताना रामासारखा वाग. बाईला सीतेसारखी राहा असाच उपदेश केला जातो. यातच कैकयीने आपल्या मुलाचे सुख पाहिले तर तिला सगळे स्वार्थी, कपटी ही विशेषणे लावली आहेत. एखादया स्वार्थी स्त्रीला लगेच कैकयीची उपमाही दिली जाते. म्हणजेच काय स्वार्थ न बघता इतरांचे सुख अगोदर बघा असाच हेतू आहे. साहित्यातही प्रत्येक वेळी हेच टसवण्याचा प्रयत्न केला जातो.

लेखकही असेच मानतात. जर मनुष्य भोगी असेल तर लगेच तो नीचतम पातळीचा टरवला जातो. तो लगेच अधम, पापीवृत्तीचा टरतो. म्हणूनच साहित्यातही ज्या स्त्रिया, माणसे हाल सोसून जीवन जगतात त्यांनाच उच्चतम मानले आहे. जे कष्ट सोसूनही स्वार्थ बघत नाहीत तेच उच्च दर्जाचे मानले आहेत. त्यामुळेच पूर्वी सती जाण्याची पद्धत निघाली असावी. जी स्त्री पतीबरोबर हसत मरण स्वीकारते ती आदर्श स्त्री ठरते. थोडक्यात जी सर्व हाल सोसून प्रसन्न मुद्रेने सर्व स्वीकारते ती चांगली. साहित्यात तर सगळीकडे असेच दिसते. जी पात्रे पराकोटीचा

त्याग करतात ते साहित्य दर्जेदार असते. लेखकांचीही मानसिकता अशीच दिसते. लेखकही या सर्व गोष्टीकडे त्यागीवृत्तीनेच पाहतात त्यामुळेच त्याग सर्वश्रेष्ट तर भोग म्हणजे अध:पात हे चित्र साहित्यात दिसते.

पुढील प्रसंग भारतात घडले तर... -

लेखक लेखन करताना आपले स्वानुभव लिहत असतो. लेखकाला आपल्या अनुभव विश्वातील वेगळे काहीतरी असले तर नमूद करतात. म्हणजेच आपल्या कल्पनेपेक्षा अधिक काहीतरी असल्यास त्याचे लेखन केले जाते. या कथासंग्रहातही लेखकांनीही आपल्या जगापेक्षा, कल्पनेपेक्षा वेगळे काहीतरी वाटले आहे म्हणूनच त्यांनी आपले हे अनुभव नमूद केले आहेत.

'गोष्ट टिना विशपची' या कथेत 'डॉ. अजिता काळे'[१] यांनी असाच एक धक्कादायक अनुभव नमूद केला आहे. टिना ही नववीतील मुलगी आहे. आणि ज्यो नावाचा तिचा वर्गमित्र आहे. या दोघांचे प्रेम आहे. या प्रेमाची परिणीती म्हणून टिना गरोदर राहते. अशावेळी टिना आपल्या मित्राला घेऊन अजिताकडे तपासणी करण्यासाठी येते. तपासणी पॉझिटिव्ह येते तेव्हा टिना अतिशय खुप होते. ज्यो मात्र त्यामानाने नाराज दिसतो. कारण त्याच्यावर सर्व जबाबदारी येणार असते. यावेळी टिनाला फक्त आपण आई होणार एवढच कळत असतं. ती आई होणार यापुढे ती समाज, आई वडील, आपल करियर या सर्व गोष्टी पूर्णपणे विसरते. नंतर थोडया दिवसांनी टिनाचे आई, वडील व टिना डॉक्टरला भेटण्यासाठी येतात. तेव्हा तिचे आई वडील टिनाला गर्भपात करण्यास सांगा असे डॉक्टरला सांगतात. तर टिना डॉक्टरला विचारते माझ्या इच्छेविरूद्ध तुम्ही गर्भपात करणार का? जेव्हा डॉक्टर सांगतात की जोपर्यंत तुझ्या मनात नाही तोपर्यंत कोणीही गर्भपात करणार नाही. हे समजल्यावर टिना निर्धास्त होते. टिना यावेळीही आई, वडील, डॉक्टर यांच कुणाचंच ऐकत नाही. ती बाळाला जन्म देण्याचा निर्णय घेते.

एक वर्षानंतर पुन्हा ती डॉ. अजिताकडे येते. तेव्हा मात्र पूर्वीची टिना व आताची टिना यात खूपच फरक दिसतो. यावेळाची टिनाही अल्लड नसते तर धीरगंभीर व परिस्थितीने गांजलेली टिना दिसते. तिच्या हातात एक मूल असते. त्यावेळी डॉक्टर चौकशी करतात तेव्हा टिनाची हकीकत समजते. टिना मुलाला जन्म दिल्यावर ज्यो तिला सोडून गेला. आई वडीलही

टिनाला घराबाहेर काढतात. ती सरकारी मदत स्वीकारते पण तीही अपुरी पडते. अशावेळी ती पूर्ण निराधार होते. तिला स्वत:ला व बाळाला सांभाळण्यासाठी एका व्यक्तीची गरज भासते. फक्त एवढयाच कारणासाठी ती दुसरा मित्र करते. आता त्या दुसऱ्या मित्रापासून दिवस गेले आहेत. पण तिला हे मूल नको म्हणूनच ती डॉक्टरकडे गर्भपात करण्यासाठी व संततीनियमनाची माहिती घेण्यासाठी आली आहे.

एकूण कथेवरून टिना तिचे आई वडील या घटनेकडे कसे पाहतात याचाच आश्चर्य वाटते. टिना आपण गरोदर आहे हे समजल्यावर आनंदित होते. ती जराही घाबरत नाही. ही गोष्ट लपवण्याचा प्रयत्न करीत नाही. आई वडीलही समाज काय म्हणेल प्रतिष्टा पत यांचा कोणताही विचार करताना दिसत नाही. तिच्या आईवडीलांना तिचे मूल म्हणजे एक भार त्याच्यावर पैसे कुठले खर्च करायचे एवढाच विचार आहे. बाकी जास्त काही नाही. त्यांचा सगळयांचा याकडे पाहण्याचा दृष्टिकोण बघितला तर आपल्याला आश्चर्य वाटते. इथे कुठेच कुणाला वाईट वाटत नाही. लेखिका भारतीय असल्यामुळे तीही या गोष्टीकडे भारतीय दृष्टिकोनातूनच पाहते.

भारतात असे घडले असते तर ती मुलगी घाबरून गेली असती. आईवडील तर समाज काय म्हणेल, अब्रु जाईल या भितीने मुलीलाच छळले असते. मुलगीला सक्तीने गर्भपात करायला लावले असते. मुलगीचे पटकन लग्न करून टाकले असते. कारण भारतात या गोष्टींना अतिशय महत्त्व आहे. समाजातील प्रतिष्ठा, घराण्याची परंपरा, संस्कार या गोष्टीवरूनच टरवले जाते. अशावेळी सर्व दोष मुलीला दिला जातो. पर्यायाने आईवडीलांचाही नाचक्की होते. त्यामुळे अशा प्रकरणात सर्व काही दाबून ठेवले जाते. सगळे गुपचूप आवरून मोकळे होतात. उलट काही झालेच नाही असे दाखवले जाते. असा अनुभव लेखिकेला असल्यामुळे लेखिकेने हा नवा धक्कादायक अनुभव म्हणून नमूद केला आहे.

'खजुराहो' या कथेत मुकंद सोनपाटकी[२] यांनीही असाच वेगळा अनुभव लिहिला आहे. पामेला ही एक हॉटेल चालवणारी स्त्री आहे. ती व तिचा पती फँक हे त्या हॉटेलचे मालक आहेत. तो त्या हॉटेलच्या माध्यमातून बऱ्यापैकी पैसा मिळवत असतो. तरीही पामेला रात्री बारमध्ये नग्न नृत्य करण्यासाठी जात असते. वैशिष्टय म्हणजे तिचे हे नृत्याचे काम फ्रँकच्या

संमतीने चालले असते. आपली पत्नी बारमध्ये नग्ननृत्य करते याचे त्याला काहीच वाटत नाही. जेव्हा लेखक तिला तिच्या कामाबद्दल विचारतो तेव्हा ती न घाबरता न लाजता सांगते की मी बारमध्ये काम करते ते माझ्या पतीच्या संमतीने करते. लेखक जेव्हा विचारतो की तुझ्या आणि फ्रँकच्या प्रेमात यामुळे अडथळा येत नाही का? त्यावेळी ती जे उत्तर देते ते खूपच मार्मिक आहे. ती म्हणते मी स्टेजवर जे करते ते प्रेक्षकासाठी असते. ती फक्त मनोरंजनार्थ केलेली कृती असते. रात्री घरी आल्यावर फ्रँकला मन ओवाळून देते ती प्रेमाची शेजारती! त्या प्रेमात जोपर्यंत अंतर नाही तोपर्यंत फ्रँक केव्हाही मला त्याचीच मानणार, आम्ही एकमेकांकरताच जगणार!

भारतीय समाजाचा या ठिकाणी विचार केला तर इथले लोक स्त्रीयांना नोकरीलासुद्धा जाऊ देत नाहीत. भारतीय पती आपल्या पत्नीला कोणतेच स्वातंत्र्य देत नाहीत. पत्नीने काय वापरावे, कुठे जावे, कोणते काम करावे हे सर्व तेच ठरवतात. प्रसंगी तिला एखादया गुलामाप्रमाणे वागणूक दिली जाते. पत्नीचे काम करणे हे कुटुंबाच्या दृष्टीने प्रतिष्टेचा प्रश्न असते. तिचे बाहेरचे वागणे, बोलणे यावर घराण्याची अब्रू अवलंबून असते. त्यामुळेच भारतातील पती बायकोचे असले काम कधीच चालवून घेणार नाही. वेळ आलीच तर घरदार उपाशी राहतील पण असे काम करू देणार नाही. हा प्रसंग, ही गोष्ट लेखकातील महाराष्ट्रीय मनाला वेगळी वाटली. म्हणूनच इथे ही कथा दिली आहे.

'बार मित्झ्वा' या कथेत दिलीप चित्रे[3] यांनी पाश्चात्य लोकांची नाती कशी असतात. ते उलगडून दाखवले आहे. 'बार मित्झ्वा' या कार्यक्रमात मुलांच्या आईवडीलांचे पहिले नातेवाईक म्हणजे पहिला पती पहिली पत्नी त्यांची मुले या सर्वांना बोलावले जाते. वैशिष्टय म्हणजे या कार्यक्रमात धर्मगुरू पोप तेरा वर्षाच्या मुलाला आपल्या हाताने मुलाला मद्याचा प्याला देतात. मुलगा मोठा झाला असे मानले जाते. या कार्यक्रमात सर्व नातेवाईक मोठया आनंदाने सहभागी होतात. यात घटस्फोट घेतलेला पती, घटस्फोट घेतलेली पत्नी आपल्या नव्या साथीदारासोबत सहभागी होते. मुलेही बरोबर असतात. या सगळयांच्यात कुठेही तक्रार नसते. कुठेही द्वेष दिसून येत नाही.

भारतीय मात्र घटस्फोट झाल्यानंतर त्या व्यक्तीशी कोणताही संबंध ठेवला जात नाही. शक्यतो कोणत्याच कार्यक्रमात समोरासमोर येत नाहीत,. पण परदेशात मात्र असे काही दिसत

नाहीत. त्यांच्या मनाची तयारी व ही वागण्याची पद्धती पाहिल्यावर मराठी माणसाला अचंबा वाटल्याशिवाय राहत नाही.

'आव्हान' या कथेत नरेंद्र मिन्दकर[8] यांनी रशियातील एका वरिष्ट हुद्दयावरील माणसाच्या माध्यमातून तेथील लोकांचा नात्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण कसा आहे हे दाखवले आहे. अलेक्झांदर सेर्गिएविच हे रशियातील परराष्ट्र खात्यात मोटया हुद्दयावर आहेत. त्यांच्यामते त्यांच्या मुलाने आपल्या पसंतीच्या मुलीशीच लग्न करावे. त्या मुलीचे घराणेही राजकारणाशी संबंधीत आहे. म्हणूनच तिच्याशी लग्न करावे असे मत आहे. पण मुलगा हे सगळे नाकारतो त्यामुळे अलेक्झांदर खूप रागावतात प्रसंगी मुलाला घराबाहेरही काढण्यास मागे पुढे पहात नाहीत. तसेच त्यांच्या पहिल्या पत्नीच्या निधनानंतर त्यांनी 'तमारा'शी विवाह केला. तमारा ही वयाने अलेक्झांदरपेक्षा खूपच लहान होती. त्यामुळेच तिला बरेच मित्र होते. अलेक्झांदरही या मित्रांकडे आपल्या वाढत्या वयाची जाणीव टेवून दुर्लक्ष करीत होते. तमाराचा बोरिस नावाचा मित्र हा दोन नंबरचा धंदा करणारा आहे. तो तमाराला किंमती हिऱ्याची अंगटी भेट देतो. ती अंगटी तमारा आपल्या पतीला दाखवते तेव्हा अलेक्झांदर ती अंगटी काढून घेतात व ही अंगटी कोटून कशी आली याची गुप्तचर विभागातर्फे चौकशी केली जाईल. तमारा हे ऐकून खूपच चिडते. अलेक्झांदर सांगतात दंगा करू नकोस दंगा करून काही उपयोग नाही.

भारतात असा प्रसंग येणारच नाही. कारण इथे पत्नीला म्हणजे स्त्रीला मित्र नसतात. त्यामुळे मित्राने दिलेली भेट हा प्रश्नच नाही. भारतात स्त्रीने एखाद्या परपुरुषाशी संबंध टेवला तर ती व्यभिचारी टरते व तिला कुटुंबाबाहेरच काढतात. त्यामुळे असा प्रसंग व त्यातले पती पत्नी यांचे संबंध पाहिले की मराठी माणूस गोंधळात पडतो. त्याच्या दृष्टीने हा वेगळाच अनुभव आहे. हा अनुभव इतरांना समजावा म्हणून ही कथा लिहली आहे.

'परदेशवास : एक पत्रात्मक चिंतन' या कथेत जयंत भालचंद्र बापट[9] यांनी परदेशात लोक कसे राहतात त्याचे विवेचन दिले आहे. विशेषकरून तिथली मुले व पालक यांचे संबंध व प्रौढ लोक यांच्या समस्या यावर प्रकाश टाकला आहे. तिथे मुले १२ ते १२ वर्षाची झाली की छोटी छोटी कामे करतात व स्वावलंबी होतात. मुले आईवडीलांना बोर्ड देतात. आईवडिलांना खाण्याचे व राहण्याचे पैसे देतात. मुले स्वत: सगळे निर्णय घेतात. आईवडिलांचे मत घेतले

जात नाही. निवृत्त झालेल्या लोकांनी सांभाळायला कोणीही तयार होत नाही. त्यामुळं या लोकांना आपले आयुष्य रिटायरमेंट व्हिलेजमध्ये एकाकी घालवावे लागते. त्यातून आत्महत्येसारखे प्रकार घडतात.

भारतीय लेखकांनी जेव्हा हे आयुष्य पाहिलं तेव्हा त्यांना धक्काच बसला. भारतात अजून आईवडील हे मूलांचे सर्व कर्ताधर्ता असतात. प्रत्येक गोष्ट आईवडिलांना विचारून केली जाते. कुटुंबात आजी आजोबा असतात. त्यांना मानाने वागवले जाते. तिथलं आयुष्य व इथलं आयुष्य यातल वेगळेपण जाणवल म्हणूनच ह्या कथेत ह्या गोष्टी आल्या आहेत.

भारतातील लोक भारतात म्हणजे मर्यादित क्षेत्रात आपल आयुष्य जगत आहेत. यातले अगदी टरविक लोक बाहेर गेले आहेत. जगात इतर टिकाणी अमेरिका, रशिया इतर टिकाणी उदयोगाच्या निमित्ताने स्थायिक झाले आहेत. जरी ते तिथे राहत असले तरी त्यांची मूळ वृत्ती गेलेली नाही.

शरीराने परदेशात व मनाने भारतात अशी काहीतरी द्विधा अवस्था झाली आहे. त्यामुळे त्यांनी आपल्याला जाणवलेले वेगळेपण कथांच्या, प्रसंगाच्या रूपात नमूद केलेले आहे. ह्या लेखनात मात्र कुठेही खंत व्यक्त केलेली नाही. जे काही आहे ते अगदी न खळखळता स्विकारले आहे.

भारतात राहणाऱ्या आपल्या बांधवांना भारताबाहेर लोक कसे जगतात हे कळावे हयासाठीही हे लेखन आहे. आपण सदैव परदेशाच गुणगान करतो तिथे खूप पैसा आहे. पर्यायाने समाधान आहे असे भारतीयांना सतत वाटत असते. पण त्याचे उत्तर आपल्याला 'परदेशवास : एक पत्रात्मक चिंतन' यात जयंत बापट यांनी दिले आहे. परदेशात जसा पैसा भरपूर आहे तसा मानसिक जिव्हाळा खूप कमी आहे. तिथे माणूस एकाकी होत चालला आहे. त्यामुळे तो सुखी आहे की दु:खी हे आपणच टरवायच म्हणजे जगातली इतर माहितीही आपल्याला समजते. स्वर्ग हा कुठे आहे हे शेवटी ज्याने त्याने टरवावे आणि बदलत्या जगात आपण आपल्या रूढींना परंपरांना कितपत चिटकून राहायचे ते आपणच टरवावे. जगातील लोक कसे झपाटयाने बदलतायत त्या बेताने आपण कसे राहायचे. आपण कोणते बदल केले

पाहिजेत. आपला दृष्टिकोण कसा ठेवावा हे ही लक्षात येते. म्हणजेच या कथालेखकांनी उद्‌बोधन व माहिती ही दोन्ही प्रयोजनही साधली आहेत.

<u>व्यक्तिस्वातंत्र्याचे परिणाम</u> –

'जे करायचे नाही हे ज्यामध्ये सांगितले आहे. ती बंधने स्वेच्छेने स्वीकारणे आणि अंगलात आणणे म्हणजे संस्कृती होय.' भारतीय संस्कृतीत ही बंधने जास्तच आहेत. पाश्चात्य संस्कृतीत त्यामानाने ही बंधने लवचिक आहेत. भारतीय संस्कृती ही त्यागी संस्कृती आहे. त्याग हाच जीवनाचा पाया मानला जातो. त्यावरच कुटुंबव्यवस्था उभी आहे. पर्यायाने समाजही त्यागावरच अवलंबून आहे. इथे व्यक्तीस्वातंत्र्याचा संकोच होऊन समाजकल्याणाला जास्त महत्त्व आहे. पण पाश्चात्य संस्कृती त्यामानाने जास्त व्यक्तिस्वातंत्र्य देणारी आहे. तिथे प्रत्येक गोष्टीचा उपयोग घेण्याकडे जास्त कल आहे. पैसा मिळवणे व त्याचा जास्तीत जास्त उपभोग घेणे एवढेच महत्त्वाचे मानले आहे. तिथे नातलगांसाठी त्याग करणारी माणसे विरळच. प्रत्येकजण स्वत:चा, स्वत:च्या सोयीचा जास्त विचार करतो. व्यक्तीस्वातंत्र्याचा प्रभाव जास्त असल्यामुळे प्रत्येकजण आपल्याला सोयीचे पडेल असे जगतो. त्यामुळे एकूण समाजावर काय परिणाम होईल याचा विचार केला जात नाही.

पाश्चात्य समाजात कुटुंब व त्यातील नाती यांना जास्त महत्त्व नाही. प्रत्येकजण आपापले करियर करण्याच्या नादात असतो. त्यामुळेच इथे तरुणींना मुले म्हणजे एक समस्या वाटते. कारण मुलांना सांभाळण्यासाठी वेळ दयावा लागतो. हा वेळच त्यांच्याकडे नसतो. आयुष्याची ऐन उमेदीची वर्षे मुले सांभाळण्यात घालवण्यास स्त्रिया तयार नसतात. त्यामुळे इथे तरुणी लवकर लग्ने करत नाहीत. मुले सांभाळण्यासाठी घरात आया ठेवली जाते. त्यामुळे मुलांना आईवडिलांचा लळा लागत नाही. मुलांना आईवडील हे विशेष महत्त्वाचे वाटत नाहीत. मुले थोडी मोठी झाल्यावर आईवडिलांपासून वेगळी होतात. काही मुले छोटया मोटया नोकऱ्या करून पैसे मिळवू लागतात. त्यामुळे ही मुले स्वावलंबी होतात. मुले आईवडिलांना बोर्ड देतात. बोर्ड म्हणजे खाण्याचे राहण्याचे पैसे देतात. मुले स्वत: मिळवत असल्यामुळे ते आईवडिलांवर

अवलंबून नसतात. त्यामुळे मुले आपले निर्णय आपणच घेतात. आईवडिलांना विचारावे, त्यांचे मत घ्यावे असेही वाटत नाही. त्यांच्या जीवनात आईवडिलांना विशेष स्थान असत नाही.

पाश्चात्य संस्कृतीत व्यक्तीस्वातंत्र्याचा अतिरेक झाल्यामुळे तिथे कोण कोणाला विचारत नाही. प्रत्येकजण आपल्या सोयीनुसार जगतो. त्यामुळे कुटुंबसंस्था कोलमडली आहे. तिथे घटस्फोटाचे प्रमाण ३० ते ४० टक्के इतके जास्त आहे. त्यामुळे मानसिक त्रास होतो. मानसिक रोगीही खूप आढळतात. सुखाच्या मागे लागल्यामुळे किंवा नेमके सुख कशात आहे हे न समजल्यामुळे माणसे फक्त धावताना व पैसा कमावताना दिसतात. या धावपळीमुळे माणूस एकाकी झाला आहे. प्रत्येक माणूस गर्दीत राहात असला तरी एकटाच असतो. तिथे माणसांच्यात मानसिक जिव्हाळा जाणवत नाही. प्रत्येक गोष्ट व्यावहारिक दृष्टीने पूर्ण केली जाते.

मुलांच्या प्रश्नाबरोबर प्रौढांचेही प्रश्न आहेत. त्या धावत्या जगात वयस्क लोकांसाठी कुणाजवळही वेळ नाही. असे वयस्क रिटायरमेंट व्हीलेजमध्ये आपले उर्वरीत आयुष्य घालवत असतात. काहीवेळा हे एकाकीपण असह्य होतं अशावेळी खेळण्यासाठी पैसे देऊन जोडीदार बोलवतात. काहीवेळा काही वयस्क या एकाकीपणाला कंटाळून आत्महत्या करतात. माणसाचा जर असा शेवट झाला तर जास्त पैसा मिळवून काय उपयोग. व्यक्तीस्वातंत्र्याचा जास्त अतिरेक झाल्यामुळेच या सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत.

भारतीय कुटुंबसंस्थेप्रमाणे इथली माणसांची नाती घट्ट नसतात. नात्यांची वीण सैल आहे. इथे मुले आईवडिलांचे ऐकत नाहीत. आपल्या मनाला येईल असेच वागतात. लैंगिक स्वातंत्र्य हे अमर्याद असल्यामुळे अगदी नववी दहावीत मुली गरोदर राहतात. वैशिष्ट्य म्हणजे त्या मुलींना त्याचे काहीच वाटत नाही. इथे कुमारी माताही बऱ्याच आहेत. अशा मुलींना सरकारी मदत मिळते. त्यामुळे समाजात शील हा प्रकारच नाही. व्यभिचाराच्या कल्पना वेगळयाच आहेत. पती, पत्नीच्या नात्यात एकनिष्ठता दिसत नाही. प्रत्येक स्त्री पुरुषाची कमीतकमी दोन तीन लग्ने झालेली दिसतात. इथे लग्नाअगोदर बरीच वर्षे एकत्र राहणारे स्त्री-पुरुष आहेत. इथे प्रत्येकजण आपल आयुष्य आपल्या मर्जीने जगत असतो. इथली माणसे दुसऱ्यांच्या आयुष्यात विनाकारण नाक खुपसत नाहीत. दुसऱ्याच्या खाजगी गोष्टीत ढवळाढवळ

करीत नाहीत. त्यामुळे प्रत्येकजण अलिप्त जीवन जगत असतो. भारतीय स्त्रियांच्या मानाने इथे खूपच स्वातंत्र्य आहे. स्त्रिया या उच्चशिक्षित व अर्थाजन करणाऱ्या आहेत. इथे स्त्री-पुरुष भेदभाव केला जात नाही. ज्याची पात्रता असते त्याप्रमाणे काम व दाम मिळते.

भारतीयांप्रमाणे इथे धर्माचे प्रस्थ जास्त नाही. त्यामुळे जास्त रूढी परंपरा घट्ट नाहीत. काही ठराविक कार्यक्रम वेगळयाच थाटात साजरे केले जातात. त्यापैकी ख्रिसमस हा सण येशूचा जन्मदिवस खूप उत्साहात साजरा करतात. लग्नही चर्चमध्ये धर्मगुरूंच्या मार्फत लावले जाते. लग्ने ही दोघांच्या पसंतीने केली जातात. 'बार मित्झ्वा' सारख्या कार्यक्रमात सगळे पाहूणे हजर असतात. यात पहिली पत्नी तिचा पती त्यांची मुले त्याचप्रमाणे दुसरी पत्नी तिची मुले असतात ही सर्व पाहूणे मंडळी एकत्र येतात तेव्हा कुणीही कुणाची टिंगल करीत नाहीत. सर्वजण अगदी आवर्जुन हजर राहतात यात कुठेही नाराजी दिसत नाही. मुलाला आशीर्वाद देण्यासाठी स्वत: जातीने पोप हजर राहतात. त्यांच्या परंपराही जास्त कडक नाहीत. परंपरा, रूढी ह्या समाजासाठी असतात. परदेशात समाजच एकसंघ नाही. त्यामुळे परंपराचे रूढींचे जास्त महत्त्व नाही.

परदेशात कोणत्याही कामाला कमी लेखले जात नाही. प्रत्येक काम तितकेच महत्त्वाचे मानले जाते. अगदी सुतार, गवंडी ही मंडळीसुद्धा कामावर जाताना महागडया अशा गाडयामधून जातात. ज्याला स्वत: मेहनत करण्याची इच्छा आकांक्षा आहे. अशा लोकांना आपले कर्तृत्व दाखवण्याची भरपूर संधी आहेत. एकूणच खूप स्वतंत्र जीवन आहे. व्यक्तिस्वातंत्र्य अमर्याद आहे. व्यक्तिस्वातंत्र्य ही एक दुधारी शस्त्र आहे. इथे कोण तुमच्यावर अवलंबून असणार नाही. त्याचप्रमाणे तुम्हाला कोण विचारणार नाही हे पण तेवढच सत्य आहे. त्यामुळेच भोगवृत्ती वाढीला लागली आहे.

पाश्चिमात्य लोक समाजाकडे बघताना ठराविक दृष्टिकोण ठेवून बघत नाहीत. म्हणजे असं की भारतात प्रत्येकजणाने कसे वागावे याच्या चौकटी तयार आहेत. पण परदेशात असे काही दिसत नाही. व्यक्तीस्वातंत्र्यामुळे प्रत्येकजण आपल्या इच्छेला येईल तसे वागत असतो. परदेशात कोण कुणालाच विचारत नाही. तिथे माणसाला आपल्या वागण्याचा खुलासा देण्याची गरज नसते. कोण कुणाच्याही खाजगी आयुष्यात ढवळाढवळ करीत नाही. प्रत्येकजण आपले

आयुष्य आपल्या इच्छेप्रमाणे जगत असतो. तिथल्या लोकांची मानसिकताही तशीच असते. आपल्याला दुसऱ्याच्या गोष्टीत रस घेऊन काय उपयोग त्याला बरे वाटत असेल तो तसे वागत असेल असे म्हणून सोडून दिले जाते. माझे जीवन, माझे करियर, माझी इच्छा ह्या गोष्टी सोडून इतर गोष्टींकडे लक्षच दिले जात नाही.

'गोष्ट टिना विशपची' या कथेत अजिता काळे यांनी तिथल्या समाजातील कुमारवयातील मुलींची परिस्थिती कशी आहे. ते लिहिले आहे. टिना ही नववीतील मुलगी आहे. तिचा मित्र ज्यो याच्यापासून तिला दिवस गेले आहेत. तरी ती नाराज न होता तिला उलट आनंद होतो व ती मुलाला जन्म देण्याचे ठरवते. त्यावेळी तिचे आईवडील एक जबाबदारी नको म्हणून तिला गर्भपात करण्यास सांगतात. पण त्यांच्या सांगण्यात कुठेही लज्जा किंवा दिसत नाही. कारण मुलीचे गरोदरपण किंवा तिचे शारीरिक संबंध ही गोष्ट त्यांना अनाकलनीय वाटत नाही. मुलगी वयात आली म्हणजे असा अपघात होणारच असे त्यांना वाटते. त्यात धक्का बसण्याचे काही कारण नाही. अशा घटना आयुष्यात घडणार असे त्यांनी गृहीतच धरले आहे. तिथल्या शासनानेही कुमारी मातांना खास सोय दिली आहे. त्यांच्या मुलांना सांभाळण्यासाठी पैसे मिळतात. म्हणजेच शासनानेही या गोष्टी मान्य केल्या आहेत. अशा गोष्टीकडे समाजही एक नित्याची बाब म्हणून पाहतो. त्यात एखादी आगळीक घडली आहे. होऊ नये ते झाले आहे असे मानत नाहीत. त्यांनाही कुमारीमाता, कुमारी मुलींचे गरोदरपण, गर्भपात या गोष्टी गृहीत धरल्या आहेत. त्यांच्यादृष्टीने त्या दैनंदिन घडणाऱ्या घटना आहेत. त्यामुळे त्यांना या गोष्टी स्वैराचार वाटत नाहीत. शारीरिक संबंध व गरोदरपण या नैसर्गिकच आहेत असे ते मानतात. त्यामुळे या गोष्टीचा जास्त बागुलबुवा केला जात नाही.

'पद्धतशीर' या कथेत स्मिता पालीवाल[६] यांनी अपघात करणे हा सुद्धा कसा व्यवसाय असतो हे सांगितले आहे. या कथेत एक जोडपे आहे. हे लोक जुन्या गाड्यांचा पद्धतशीरपणे अपघात घडवून आणत आणि विमा कंपनीकडून पैसे मिळवत हा यांचा व्यवसायच असतो. यात पोलिस, विमा एजंट हेसुद्धा सहभागी असतात. यात त्यांचाही वाटा ठरलेला असतो. हे सर्व करत असताना त्यांना कुठेही खंत जाणवत नाही. किंवा आपण जो पैसा मिळवतो तो गैरमार्गाने मिळवतो आहे. हा मार्ग चूकीचा आहे असे त्यांना वाटत नाही. त्यांना फक्त पैसा मिळण्याशी

मतलब आहे. तो कसा कुठून आला हे महत्त्वाचे नाही. आपल्यासारख्या योग्य मार्गानेच पैसा मिळवून जगले पाहिजे असे वाटत नाही. असा पैसा मिळवणे त्यात काही गैर नाही असेच त्यांना वाटते. इतर लोकांनाही त्याचे काही वाटत नाही. इतर लोक, समाजही याकडे दुर्लक्षच करतो शेवटी काय करायचे हे ज्याचा त्याचा प्रश्न आहे. असे मानून सोडून दिले जाते.

'आव्हान' या कथेत नरेंद्र सिन्दकर यांनी स्त्री-पुरुष संबंध यावर प्रकाश टाकला आहे. यात अलेक्झांदर हे एक रशियाच्या परराष्ट्र खात्यातील वडे अधिकारी आहेत. त्यांनी तमारा नावाच्या स्त्रीशी पहिल्या पत्नीचे निधन झाल्यावर लग्न केले. तमारा ही अलेक्झांदर यांच्या मानाने खूपच तरुण आहे. यामुळेच किंवा आपल्या वाढत्या वयाची जाणीव टेवूनच त्यांनी तमारा व तिचे मित्र याकडे दुर्लक्ष केले. थोडक्यात त्यांनी तमाराच्या शारीरिक भुकेसाठी मुभा दिली. त्यांनी हेतूपूर्वक तमारा व तिचा मित्र यांच्या संबंधाकडे दुर्लक्ष केले. त्यांचे दोघांचे संबंध आहेत हे त्यांनी मान्यच केले. वैशिष्टय म्हणजे ते एक पती असूनही त्यांना आपल्या पत्नीच्या असल्या संबंधांचा राग नाही. त्यांनी ही गोष्ट तमाराची शारीरिक गरज म्हणून स्वीकारली आहे. शारीरिक गरज ही नैसर्गिकच असते. त्यामुळे त्यात स्वैराचार आलाच नाही. त्यांच्यामते ही तिची गरजच आहे. ती तिने भागवली तर कुठे बिघडले. समाजही असे संबंध असेल तर जास्त खोलात न जाता ज्याला जे पटले ते केले यानुसार या गोष्टीकडे दुर्लक्ष केले जाते. त्यांच्यादृष्टीने हा ज्याचा त्याचा खाजगी प्रश्न आहे. कोणी कोणाशी कसे संबंध ही गोष्ट स्वैराचार न ठरता एक शारीरिक गरज ठरली आहे. एक दैनंदिन घडणारी गोष्ट झाली आहे.

'खजुराहो' या कथेत मुकूंद सोनपाटकी यांनी व्यवसाय व खाजगी आयुष्य यावर प्रकाश टाकला आहेत. यात पामेला व फ्रँक हे एक जोडपं आहे. यांच्या मालकीचे स्वत:चे हॉटेल आहे. फ्रँक व पामेला हे स्वत: चालवत असतात. हॉटेल बऱ्यापैकी चालत असते. म्हणजे कुटुंब त्यांचे व्यवस्थित चालत असते. एवढी चांगली आर्थिक स्थिती असताना 'पामेला' ही फ्रँकची पत्नी एका बारमध्ये नग्ननृत्य करण्यासाठी जात असते. वैशिष्टय म्हणजे ती हे नृत्याचे काम करते हे फ्रँकच्या सहमतीनेच करते. फ्रँक आपल्या पत्नीला असले काम करण्याची परवानगी देतो. जेव्हा लेखक पामेलाला या गोष्टीविषयी बोलतो तेव्हा पामेला चांगले मार्मिक उत्तर देते. तू हे काम का करतेस? तूझे फ्रँकवर प्रेम आहे का? तुमच्या दोघांच्या प्रेमात अंतर

येत नाही का? अशा प्रश्नांचे ती उत्तर देते. "मी स्टेजवर जे काम करते ती लोकांच्या रंजनार्थ केलेली एक कृती असते आणि घरात आल्यावर मध्यरात्री फ्रँकवरून मन ओवाळून टाकते ती खरी प्रेमाची शेजारती! माझ्या त्या प्रेमात जोपर्यंत अंतर येत नाही तोपर्यंत फ्रँक केव्हाही मला आपलीच मानणार.

परदेशात काम व खाजगी आयुष्य ह्या दोन वेगळया गोष्टी आहेत. इथं कामावरून त्या व्यक्तीचे चारित्र्य ठरवले जात नाही. काम हे फक्त पैसे मिळवण्यासाठीच असते असं मानलं जातं. त्यात सामाजिक प्रतिष्टा अशा गोष्टी येत नाहीत. ज्याला जमेल ते त्याने काम करावे असे मानले जाते. पामेलाचे हे काम फ्रँकच्या व तिथल्या समाजाच्या दृष्टीने हीन पातळीचे नाही. कामावरून माणसाची पात्रता ठरवली जात नाही. काम हे फक्त पैसे मिळवण्याचे माध्यम असते त्यामुळे ते कोणतेही असले तरी त्यांच्या दृष्टीने फरक पडत नाही. पामेलाचे नग्ननृत्य करणे व पैसा कमावणे ही गोष्ट चैनीची किंवा स्वैराचार न ठरता ती सर्वांच्या दृष्टीने एक पैसा मिळवून देणारी गोष्ट आहे. त्यामुळेच पामेला, फ्रँक व इतर लोक यांना त्याचे काहीच वाटत नाही.

या कथासंग्रहात असे बरेच प्रसंग अशा बऱ्याच घटना आल्या आहेत की त्या गोष्टी आपल्याला स्वैराचार वाटतो. पण त्यांच्या दृष्टीने विचार केला तर या गोष्टी सामान्य आहेत. परदेशात राहताना त्या गोष्टी त्यांना गरज वाटतात. दैनंदिन गरजा भागवण्यासाठी केलेल्या त्या नैसर्गिक कृतीत आहेत असे त्यांचे मत आहे. त्यांना या गोष्टी अवाजवी वेगळया अशा वाटतच नाहीत.

आपण आतापर्यंत परदेशात स्वैराचार कसा चालतो. तिथे व्यक्तिस्वातंत्र्य खूप आहे. लैंगिक बंधन नाही. त्यामुळे वेगवेगळया समस्या निर्माण होतात हे पाहिले पण आपण भारतीयही या गोष्टीत मागे आहोत असे म्हणून चालणार नाही. भारतीय लोक आता प्रत्येक गोष्टीत परदेशीय लोकांचे अनुकरण करीत आहेत. भारतीय तरूण तर अंधानुकरण करीत आहेत. तरुणांच्यात तर फॉरेन रिटर्न माणसांच्या सर्वच गोष्टींचे अनुकरण करण्याची फॅशनच आहे. जसे अमेरिकेत, इंग्लंडमध्ये राहतात, वागतात तसे करावे असे आता प्रत्येक तरुणाला वाटू लागले आहे.

भारतीयांच्या बऱ्याच रूढी, परंपरा या जागतिकीकरणाच्या दुनियेत मागे पडल्या आहेत. आता पूर्वीप्रमाणे प्रत्येक सणाला उत्साह नसतो. नागपंचमी, होळी, बैलपोळा यासारख्या सणात तरूण तरूणी भाग घेताना दिसत नाहीत. पूर्वीप्रमाणे देवी देवतांची पूजा, सागसंगीत करताना नवीन पिढी दिसत नाही. फॅशनच्या नावाखाली नास्तिकपणा वाढत चालला आहे. मुले मुली देव. व्रतवैकल्ये या गोष्टी विसरत चालली आहेत. समाजात आधुनिकीकरणाची ही लाट इतकी जोरदार आहे की यात मूळ भारतीय संस्कृती हरवते की काय असे भय वाटू लागले आहे.

भारतीय पोषाख, अन्न यातही फरक पडला आहे. तरूणीही सर्रास पँटचा वापर करताना आढळतात. थोडया दिवसांनी साडया नेसणे म्हणजे एक कला होईल असे वाटते. आता काही विवाहित स्त्रियाही साडी नेसत नाहीत. पुरूष तर धोतर, पायजमा या गोष्टी कधीच वापरत नाहीत. ते ही सर्रास पँट, टी शर्ट हेच वापरताना दिसतात. अन्नाच्या बाबतही तेच आहे. फास्टफूडच्या नावाखाली चायनीज, जापनीज पदार्थ खाल्ले जातात. भारतीय पुरणपोळी आता स्वयंपाक घरातून गायब व्हायला लागली आहे. आताच्या मुलींना पुरणपोळी बनवताही येत नाही. म्हणजेच हे पदार्थ बनवणारे व खाणारे आता दोन्हीही नाहीत. आधुनिकतेच्या नावाखाली आपण आपलं मुळ जे काही आहे ते सर्वच बदलत चाललो आहोत. त्यात सर्व बाह्य गोष्टींचा समावेश झाला आहे. म्हणजे अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या सोयी, सुविधा या सर्व गोष्टीत बदल झाला आहेच.

<u>भारतीयांच्या मानसिकतेतील बदल</u> –

भारतीयांच्या मानसिकतेतही आता बदल होताना दिसतो. भारतीयांनी बाह्य गोष्टीत अंधानुकरण केलेलेच आहे. पण त्याचबरोबर भारतीयांची मानसिकताही बदलत चालली आहे. प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोणही परदेशी व्हायला लागला आहे.

पूर्वी कुटुंबात एकत्र राहत असत पण आता लग्न झाल्याबरोबर तरूण जोडप्याला घरातील मोठी माणसे अडचण वाटू लागली आहेत. काही ठिकाणी तर परिस्थिती अगदी टोकाला गेलेली दिसते. यातूनच वृद्धाश्रमासारखी संकल्पना जन्माला आली आहे. आता मोठ–

मोठया शहरात प्रौढ माणसांना राहण्यासाठी वृद्धाश्रमे आहेत. हीच वृद्धाश्रमे अगदी खेडयातूनही निर्माण होतील काय अशी एकूण परिस्थिती निर्माण झाली आहे.

व्यक्तिस्वातंत्र्य ही संकल्पना आपल्यातही मूळ धरू लागली आहे. त्यामुळेच मुले कोणताही निर्णय घेताना आईवडिलांना सांगणे जरूरीचे समजत नाहीत. मला वाटले "मी केले" अशी उत्तरे मुले देताना आढळतात. पूर्वीच्या मानाने आताचे तरुण घरातील वरिष्ट लोकांना कमी मान देतात. पूर्वी घरातील लोकांचे प्रत्येक गोष्टीत मत घेतले जात होते. आता फक्त कल्पना दिली जाते. म्हणजे वयस्कांचे मत विचारात घेतले जात नाही. म्हणजेच व्यक्तीस्वातंत्र्याची ही दुधारी सुरी आता भारतीयांच्याही गळयावर फिरू लागली आहे.

पूर्वीच्या इतकी आता सामाजिक बंधनेही घट्ट राहिली नाहीत. पूर्वी एखादया मुलीने व्यभिचार केला तर तिला ठेचून मारणे हीच शिक्षा दिली जात होती. आता तीच मुलगी उलट विचारते तुम्ही कोण पवित्र आहात काय? मला विचारणारे तुम्ही कोण? तुमच्या घरात काय चाललय ते तुम्ही बघा? उगीच दुसऱ्याच्या भानगडीत नाक खूपसू नका म्हणजेच थोडक्यात काय समाजाचीही मानसिकता बदलत चालली आहे. पूर्वी एखादया मुलाने जर पळून जाऊन लग्न केले तर समाजातील सर्व लोक त्या मुलाचे, मुलीचे आई वडील त्यांच्याशी कोणताही संबंध ठेवत नव्हते. पण आता मात्र असे होत नाही. पहिले थोडे दिवस राग राग केला जातो. नंतर थोडया दिवसांनी सर्व राग मावळतो. हळूहळू त्या मुलाशी जवळीकता टेवली जाते. मुलेच आहेत चुकली असतील असे म्हणून त्यांना माफ केले जाते. पुन्हा त्यांना समाजात, घरात घेतात, पुन्हा जीवन सुरळीतपणे चालू होतं म्हणजे थोडक्यात काय म्हणायचे भारतीयांची मानसिकताही या आधुनिकीकरणात बदलत चालली आहे.

समाजात प्रत्येक पालकाला आपला पाल्य या आधुनिक वातावरणात वहात जाईल अशी एक अनामिक भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे ह्या वातावरणात पालकांना असुरक्षितता जाणवते. त्यामुळे जास्त काही वाईट होण्यापेक्षा झाल हे चांगलं झालं असं मानून बऱ्याच वेळी बऱ्याच गोष्टी मान्य केल्या जातात.

काही पालक तर परिस्थितीपुढे हात टेकून काही गोष्टी मान्य करताना दिसतात. म्हणजेच काय तर आता भारतीयांची मानसिकताही हळूहळू परदेशी व्हायला लागली आहे असे

बऱ्याच उदाहरणावरून दिसून येते. समाजात घडणाऱ्या घटनांचा जर विचार केला तर आपल्याला बदल झाला आहे, होत आहे हे मान्यच करावे लागेल. हे अंधानुकरण कितपत किती करायचे हे शेवटी कितपत किती करायचे हे शेवटी समाज व समाजात राहणाऱ्या माणसांनीच ठरवायचे आहे. अनुकरण करताना आपले मूळ सोडून चालणार नाही. इष्ट गोष्टींचे अनुकरण करणे चांगले. आपल्या मूळ संस्कृतीत खूप गोष्टी आहेत. त्या आता काळाच्या ओघात लुप्त होण्याच्या भिती निर्माण आली आहे.

# संदर्भ सूची


१. डॉ. काळे अजिता - "गोष्ट टिना विपपची" "कुंपनापलीकडले शेत"

श्रीविद्या प्रकाशन, पुणे वर्ष १९८४ पृष्ट क. १ ते १४

२. सोनपटकी मुकुंद - "खजुराहो" "कुंपनापलीकडले शेत"

श्रीविद्या प्रकाशन, पुणे वर्ष १९८४ पृष्ट क. ४१ ते ४७

३. चिंजे दिलीप दि. - "बार मित्झ्वा" "कुंपनापलीकडले शेत"

श्रीविद्या प्रकाशन, पुणे वर्ष १९८४ पृष्ट क. २०९ ते २२२

४. सिन्दकर नरेंद्र - "आव्हान" "कुंपनापलीकडले शेत"

श्रीविद्या प्रकाशन, पुणे वर्ष १९८४ पृष्ट क. ४८ ते ७३

५. बापट जयंत भालचंद्र- "परदेशवास: एक पत्रात्मक चिंतन" "कुंपनापलीकडले शेत"

श्रीविद्या प्रकाशन, पुणे वर्ष १९८४ पृष्ट क. १४० ते १४९

६. पालीवाल स्मिता - "पद्धतशीर" "कुंपनापलीकडले शेत"

श्रीविद्या प्रकाशन, पुणे वर्ष १९८४ पृष्ट क. १०८ ते १११